वाचले :- १)महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, (मदत कार्ये, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन), शासन निर्मय क्रमांक डीएमयु. २००६/प्र.क्र/१०/डीएम-१ दि.१ जुन २००६

२)महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, (मदत कार्ये, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन), शासन निर्मय क्रमांक डीएमयु. २००६/सी.आर-११/डीएम-१ दि. २५ जुलै २००६

------ooo------

क्र/नै.आ/कावि/२३१/२००७
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जळगांव दिनांक २७/२/२००७

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**आदेश**

राज्यात आपत्ती प्रणवतेत सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे जीवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणात होत आहे. जळगांव जिल्ह्यात सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टि व पूर परिस्थितीचा अनुभव लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापन बळकट करणे आवश्यक आहे. आपादग्रस्तांना तातडीने मदत देणे व विविध आपत्ती संदर्भात प्रतिबंध, निवारण, पूर्वतयारी, प्रतिसाद, मदत व पुनर्वसन इत्यादी बाबी सुव्यवस्थितपणे हाताळण्यासाठी उपरोक्त संदर्भीय आदेशानुसार जळगांव जिल्ह्याच्या क्षेत्रासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापण करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| पदसिध्द अध्यक्ष | जिल्हाधिकारी, जळगांव. |
| पदसिध्द सहअध्यक्ष | अध्यक्ष, जिल्हा परिषद, जळगांव. |
| सदस्य | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव. |
| | जिल्हा पोलिस अधिक्षक, जळगांव. |
| | जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव |
| | कार्याकारी अभि यंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव. |
| | कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, जळगांव. |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अपर जिल्हाधिकारी/निवासी उपजिल्हाधिकारी, जळगांव. |
| विशेष निमंत्रीत | आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका. |
| | जिल्हा समादेशक होमगार्डस, जळगांव. |

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची उद्दिष्टे:**

१) सदर प्राधिकरण स्थित असलेल्या शहरात उदभवणाऱ्या आपत्तीस तोंड देणे व त्वरीत प्रतिसाद देणे यासाठी आवश्यक पूर्वतयारी करणे.

२) अशा प्रधिकरणास जोडून दिलेल्या भागासाठी आपत्ती व्यवस्थापन केद्र म्हणुन कार्यवाही करणे.

३) आपत्तीस सक्षमपणे तोंड देण्यासाठी पुर्वतयारी करण्याची संकल्पना जनमानसात राबविणे.

४) आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत आसलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन सक्षम बनविणे.

५) मदत व बचाव पथके स्थापिक करून त्यांना प्रशिक्षण देणे.

६) आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत साधन सामुग्रीची माहिती संकलित करणे व वेळोवेळी सुधारित करणे.

७) कोणत्याही आपत्तीस तोंड देऊ शकतील अशी सक्षम बांधकामे करण्यासाठी आवश्यक त्या तरतुदी करणे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव हे राहणार असुन प्राधिकरणाचे संनियत्रण करणेसाठी व आढावा घेणेसाठी समितीची बैठक दरमहा घेण्यात येईल.

त्याचबरोबर आवश्यतेनुसार वेळोवेळी तातडीच्या बैठका आयोजित करणेत येईल. या बैठकीत शासनाने निर्देशित केलेल्या विविध बाबीवरील कामकाजा बाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल. तसेच केलेल्या कार्यवाही बाबत म.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक व शासनाचे संलग्न विभाग यांना कळविण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी जळगांव.

प्रति,

१) श्री. -----------------